आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.००वाजता

१३ जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जम्मू काश्मीरच्या उन्नतीसाठी सरकार वचनबद्ध असल्याचा प्रधानमंत्र्यांचा पुनरुच्चार

- जगातला सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा महाकुंभ प्रयागराजमधे सुरु

- नाशिकमध्ये झालेल्या अपघातात ५ जण ठार, १३ जखमी/ मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- विविध जागतिक कारणांमुळे देशातल्या दोन्ही शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात घसरण

**<><><><><>**

भारत प्रगतीच्या नव्या उद्दिष्टाकडे जलद गतीनं वाटचाल करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जम्मू काश्मीर मधल्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. देशाचा प्रत्येक भाग, प्रत्येक कुटुंब प्रगतीपथावर वाटचाल करेल तेव्हाच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल, असंही ते म्हणाले. जम्मू काश्मीरच्या उन्नतीसाठी सरकार वचनबद्ध असून या प्रदेशाच्या प्रगतीला बाधक ठरणाऱ्या समस्यांचं निराकारण करण्यासाठी सरकार सज्ज आहे, याचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला. या बोगद्यामुळं जम्मू काश्मीरसोबत बारमाही संपर्क कायम राहून पर्यटनाबरोबरच रोजगार निर्मिती,

आरोग्य सुविधा यानांही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ जम्मू काश्मीरच्या नागरिकांना मिळत असल्याबद्दल मोदी यांनी समाधान व्यक्त केलं. उद्घाटनापूर्वी प्रधानमंत्र्यांनी या बोगद्याच्या बांधकामावर कार्यरत अधिकारी, तंत्रज्ञ आणि अभियंत्यांशी संवादही साधला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या भारतीय हवामान विभागाच्या १५०व्या स्थापना दिन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. नवी दिल्लीतल्या भारत मंडपम् इथं होणाऱ्या या कार्यक्रमात प्रधानमंत्री ‘मिशन मौसम’चा प्रारंभ करतील. आपल्या देशाला हवामानाबाबत सतर्क आणि हवामान बदलाबाबत स्मार्ट बनवणं, हा मिशन मौसमचा उद्देश आहे. प्रधानमंत्री या कार्यक्रमात भारतीय हवामान विभाग दृष्टीकोन-२०४७ दस्तऐवज देखील जारी करतील. या दस्तऐवजात हवामानाचा अंदाज आणि व्यवस्थापन तसंच हवामानबदल कमी करण्याच्या योजनांचा समावेश आहे. प्रधानमंत्री यावेळी उपस्थितांना संबोधितही करणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या बुधवारी राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते मुंबईतल्या नौदलाच्या गोदीत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी राष्ट्राला अर्पण करण्यात येणार आहेत. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका किंवा पाणबुडी एकाचवेळी नौदलात सामील होणार आहे.

आयएनएस सुरत ही जगातल्या सर्वात मोठ्या आधुनिक विध्वंसक युद्धनौकांपैकी एक आहे. आयएनएस निलगिरीचं डिझाईन भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्युरोनं तयार केलं आहे. आयएनएस वाघशीर या पाणबुडीची निर्मिती फ्रान्सच्या नौदलाच्या सहकार्यानं करण्यात आली आहे.

याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहन मंदिराचं उद्घाटनही करतील.

**<><><><><>**

महाकुंभ मेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानानं सुरुवात झाली. २६ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महाकुंभात सहभागी होण्यासाठी लाखो भाविक तिथं जमले असून आज ५० लाख भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिलं आहे. प्रयागराजमध्ये होणारा महाकुंभ हा जगातला सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा असून त्यात ४५ कोटींहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी महाकुंभ नगरमधील मंदिरं आणि प्रमुख स्थळांवर सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे. या ठिकाणी सात थरांची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. पोलिसांनी पाण्याखाली ड्रोन आणि एआय-सक्षम कॅमेऱ्यांसह प्रगत तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. प्रयागराजला ये-जा करणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित व्हावा म्हणून रेल्वेच्या तीन हजार ३०० विशेष गाड्यांसह १० हजारपेक्षा जास्त गाड्या धावत आहेत. पायाभूत सुविधांची निर्मिती, सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि इतर गोष्टींवर प्रशासनानं विशेष भर दिला आहे. अशी माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिली आहे.

**<><><><><>**

मकरसंक्रांतीचं पर्व देशभरात उत्साहाने सुरु झालं. आज संक्रांतीचा आदला दिवस. देशाच्या विविध भागात विविध नावांनी हा सुगीचा उत्सव साजरा केला जातो. पंजाब, हरयाणा आणि उत्तर भारतात लोहडी, ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू, महाराष्ट्र आणि तेलंगणात भोगी म्हणून साजरा केला जातो. राज्यात संक्रांतीनिमित्त खरेदीचा उत्साह दिसत आहे. तीळ गूळ हलव्याचे दागिने, तसंच विविध आकारांचे रंगीबेरंगी पतंग अशा वस्तूंनी बाजार फुलले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज साजऱ्या होत असलेल्या लोहडी तसंच उद्या देशाच्या विविध भागात साजऱ्या होणाऱ्या मकर संक्रांत, पोंगल, माघ बिहू या सणानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतिक असणारे हे सण, सर्वांच्या जीवनात उत्साह आणि आनंद घेऊन येवोत, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

लोहडी आणि माघ बिहू निमित्त प्रज्वलित केला जाणाऱ्या अग्नीच्या पवित्र ज्वाला सगळ्यांच्या आयुष्यातील अडचणी दूर करतील आणि संक्रांतीनिमित्त आकाशात भिरभिरणारे पतंग सर्वांची मनं आनंदानं भरून टाकतील, अशी कामना उपराष्ट्रपतींनी केली आहे.

हे सण देशबांधवांना आनंद आणि समृद्धी देतील, अशा शब्दात केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे. पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कामाचा आढावा घेताना ते बोलत होते. समृध्दी महामार्गालगत ॲग्रो हब उभारा, कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळींची संख्या वाढवा असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

नवी मुंबईत शेतमालासाठी महा बाजार उभारण्याचे नियोजन आहे. हा बाजार आंतरराष्ट्रीय दर्जाचा असणार असून किमान दोनशे ते अडीचशे एकर जागेमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी सांगितले. राज्यातल्या प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती, कोकणात माशांसाठी तर आदिवासी भागात स्थानिक उत्पादनासाठी बाजार समिती स्थापन केली जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले. बाजार समित्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करण्याचंही नियोजन आहे.

**<><><><><>**

नाशिक शहरातल्या द्वारका चौकात काल संध्याकाळी झालेल्या अपघातात ५ जण ठार झाले, तर १३ जण जखमी झाले. निफाड तालुक्यातल्या धरणगाव इथून एक धार्मिक कार्यक्रम आटोपून परतणाऱ्या भाविकांचा टेम्पो लोखंडी सळ्या घेऊन जाणाऱ्या मालवाहू ट्रकवर आदळल्यानं संध्याकाळी साडेसातच्या सुमाराला हा अपघात झाला. जखमींची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर जखमी झालेल्यांच्या उपचारांचा खर्च शासनातर्फे करण्यात येईल, असंही फडनवीस यांनी सांगितलं आहे. दरम्यान, मंत्री गिरीश महाजन यांनी रुग्णालयाला भेट देऊन जखमींची विचारपूस केली.

<><><><><>

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करावी या मागणीसाठी आज मस्साजोगमधल्या ग्रामस्थांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं. यात देशमुख यांचा भाऊ धनंजय यांच्यासह कुटुंबीय सहभागी झाले होते. तपासाची माहिती आपल्याला आणि ग्रामस्थांनी द्यावी तसंच आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई व्हावी अशी मागणी आहे, असं धनंजय देशमुख यांना वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

<><><><><>

गेल्या काही दिवसांपासून शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आजही कायम आहे. विविध जागतिक कारणांमुळे देशातले दोन्ही शेअर बाजार मोठ्या प्रमाणात कोसळले. सध्या सेन्सेक्स सुमारे १ हजार अंकांनी घसरुन ७६ हजार ३०० आणि निफ्टी सुमारे साडे तीनशे अंकांनी घसरुन २३ हजारांच्या आसपास व्यवहार करतो आहे. अमेरिकेत बेरोजगारांची संख्या कमी झाल्यानं आर्थिक प्रोत्साहन पॅकेज मिळण्याची मावळलेली शक्यता, त्यामुळं फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची कमी झालेली शक्यता, कच्च्या तेलाचे वाढलेले दर, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून सुरू असलेली विक्री यासारख्या कारणांमुळे बाजारात घसरण होते आहे.

<><><><><>

मीटरवर चालणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सीच्या भाड्यात या आठवड्यात वाढ होण्याची शक्यता आहे. इंधन दरवाढीमुळे सरकारकडे रिक्षा, टॅक्सीचालक संघटना, एसटी महामंडळ आणि इतर शहरांतील परिवहन उपक्रमांनी भाडेवाढीसंदर्भात

विविध प्रस्ताव दिले आहेत. यासंदर्भात बुधवारी मुंबईत होणाऱ्या बैठकीत एकत्रित निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. ही दरवाढ किमान १५ टक्के असण्याची शक्यता आहे. रिक्षा, टॅक्सीच्या भाड्यात ३ ते ४ रुपयांनी, तर बसच्या तिकीट दरामध्ये १ ते ५ रुपयांनी वाढ होऊ शकते. यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ झाली होती.

**<><><><><>**

देवगडच्या हापूस आंब्याची ओळख पटण्यासाठी आता प्रत्येक आंब्यावर युनिक कोड स्टिकर लावण्यात येणार आहे. या स्टिकरचा फोटो ९-१-६-७-६-६-८-८-९-९ या क्रमांकावर व्हॉट्सपद्वारे पाठवल्यावर तो आंबा कुणाच्या शेतातला आहे, कुठला आहे हे समजणार आहे. त्यामुळे देवगडच्या हापूसच्या नावावर ग्राहकांची फसवणूक होणार नाही. प्रपप्रांतातला हापूस देवगडचा म्हणून विकण्याचे प्रकार सर्रास होत असतात, त्याला आळा बसावा यासाठी स्टिकरची व्यवस्था करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**